खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

(सुवर्णमहोत्सवी वर्ष)

प्रसिद्धी विभाग

शैक्षणिक वर्ष : २०२६ -२०२७

क्रीडा विभाग : नूतन क्रीडा विभाग उदघाटन

पुढारी

राजगुरू महाविद्यालयाच्या नूतन क्रीडा विभागाचे उद्‌घाटन करताना आ. बाबाजी काळे व अन्य मान्यवर.

संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी संस्थेच्या माध्यमातून उपलब्ध करून दिलेल्या नव्या सुविधांमुळे विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रातील सराव व कौशल्यविकासासाठी अधिक चांगल्या संधी उपलब्ध होणार असल्याने विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

शारीरिक शिक्षण संचालिका डॉ. प्रतिमा लोणारी यांनी आभार मानले.

My Pune Gramin Edition
Oct 23, 2026 Page No. 5
Powered by: erelego.com

पुढारी

राजगुरू महाविद्यालयाच्या नूतन क्रीडा विभागाचे उद्घाटन

राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील नूतन क्रीडा व जिमखाना विभागाचे उद्घाटन आमदार बाबाजी काळे यांच्या हस्ते करण्यात आले. आमदार काळे यांच्या हस्ते खंडेनवमी मुहूर्तावर क्रीडा साहित्याचे पूजन देखील करण्यात आले.

या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, मानद सचिव नानासाहेब टाकळकर, संचालक हिरामण सातकर, बाळासाहेब सांडभोर, डॉ. प्रकाश चौधरी, राजेंद्र टाकळकर, नामदेव कलवडे, वैभव घुमटकर, आशुतोष थिगळे, सत्यवान नवले, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, एसबीएमचे प्राचार्य डॉ. शिल्पा जगताप, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. विठ्ठल दौंडकर यांसह प्राध्यापक व खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार बाबाजी काळे यांनी नूतन क्रीडा विभागाची पाहणी केल्यानंतर खेळाडूंशी संवाद साधत क्रीडा क्षेत्रातील सातत्य, मेहनत आणि शिस्तीचे महत्त्व विशद केले.

My Pune Gramin Edition
Oct 23, 2026 Page No. 5
Powered by: erelego.com

पुण्य नगरी
www.epunyanagari.com

In Short

राजगुरू महाविद्यालयात नूतन क्रीडा विभाग कार्यान्वित

। राजगुरूनगर : खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील नूतन क्रीडा व जिमखाना विभागाचे उद्घाटन आमदार बाबाजी काळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आमदार काळे यांच्या हस्ते खंडेनवमी मुहूर्तावर क्रीडा साहित्याचे पूजन केले. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष देवेंद्र बुट्टे पाटील, मानद सचिव नानासाहेब टाकळकर, संचालक हिरामण सातकर, बाळासाहेब सांडभोर, डॉ. प्रकाश चौधरी, राजेंद्र टाकळकर, महाविद्यालयांचे प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, एसबीएमचे प्राचार्य डॉ. शिल्पा जगताप, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. विठ्ठल दौंडकर उपस्थित होते. आमदार बाबाजी काळे यांनी नूतन क्रीडा विभागाची पाहणी केल्यानंतर खेळाडूंशी संवाद साधत क्रीडा क्षेत्रातील सातत्य, मेहनत आणि शिस्तीचे महत्त्व विशद केले. विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात जिद्द व चिकाटीने प्रयत्न करून महाविद्यालयाचा नावलौकिक वाढवावा, असे आवाहन केले. शारीरिक शिक्षण संचालिका डॉ. प्रतिमा लोणारी यांनी आभार मानले.

लोकमत

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात नूतन क्रीडा विभागाचे उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

खंडेनवमीच्या मुहूर्तावर आमदार काळे यांच्या हस्ते क्रीडा साहित्याचे पूजन करण्यात आले.

राजगुरुनगर : खेळाडूंना सराव आणि कौशल्यविकासासाठी अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात क्रीडा व जिमखाना विभाग सुरू करण्यात आला. या विभागाचे उद्घाटन आमदार बाबाजी काळे यांच्या हस्ते करण्यात आले. खंडेनवमीच्या मुहूर्तावर त्यांच्या हस्ते क्रीडा साहित्याचे पूजन करण्यात आले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, मानद सचिव नानासाहेब टाकळकर, संचालक हिरामण सातकर, बाळासाहेब सांडभोर, डॉ. प्रकाश चौधरी, राजेंद्र टाकळकर, नामदेव कलवडे, वैभव घुमटकर, आशुतोष थिगळे, सत्यवान नवले, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, एसबीएमच्या प्राचार्य डॉ. शिल्पा जगताप, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. विठ्ठल दौंडकर यांच्यासह प्राध्यापक व खेळाडू उपस्थित होते.

उद्घाटनानंतर आमदार काळे यांनी नूतन क्रीडा विभागाची पाहणी केली. तसेच खेळाडूंशी संवाद साधत त्यांच्या क्रीडा क्षेत्रातील प्रगतीची माहिती घेतली. विद्यार्थ्यांनी जिद्द व चिकाटीने प्रयत्न करून क्रीडा क्षेत्रात यश मिळवावे आणि महाविद्यालयाचा नावलौकिक वाढवावा, असे आवाहन त्यांनी केले. संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी नूतन क्रीडा विभागामुळे विद्यार्थ्यांना नियमित सराव, शारीरिक तंदुरुस्ती आणि क्रीडा कौशल्ये विकसित करण्यासाठी चांगल्या संधी उपलब्ध होतील, असे सांगितले. विद्यार्थ्यांनी या सुविधांचा पुरेपूर लाभ घ्यावा, असेही त्यांनी आवाहन केले. शारीरिक शिक्षण संचालिका डॉ. प्रतिमा लोणारी यांनी आभार मानले.

Hello Pune Gramin
Page No. 5 Oct 24, 2026
Powered by: erelego.com

केसरी

किरण खुडे (पत्रकार)

राजगुरू महाविद्यालयाच्या नूतन क्रीडा विभागाचे उद्घाटन

राजगुरूनगर : (वार्ताहर) : खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील नूतन क्रीडा व जिमखाना विभागाचे उद्घाटन आमदार बाबाजी काळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आमदार काळे यांच्या हस्ते खंडेनवमी मुहूर्तावर क्रीडा साहित्याचे पूजनही करण्यात आले.

या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष देवेंद्र बुट्टे पाटील, मानद सचिव नानासाहेब टाकळकर, संचालक हिरामण सातकर, बाळासाहेब सांडभोर, डॉ. प्रकाश चौधरी, राजेंद्र टाकळकर, नामदेव कलवडे, वैभव घुमटकर, आशुतोष थिगळे, सत्यवान नवले, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, एसबीएमचे प्राचार्य डॉ. शिल्पा जगताप, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. विठ्ठल दौंडकर यांसह प्राध्यापक व खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार बाबाजी काळे यांनी नूतन क्रीडा विभागाची पाहणी केल्यानंतर खेळाडूंशी संवाद साधत क्रीडा क्षेत्रातील सातत्य, मेहनत आणि शिस्तीचे महत्त्व विशद केले. विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात जिद्द व चिकाटीने प्रयत्न करून महाविद्यालयाचा नावलौकिक वाढवावा, असे आवाहन करून त्यांनी खेळाडूंना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टे पाटील यांनी संस्थेच्या माध्यमातून उपलब्ध करून दिलेल्या नव्या सुविधांमुळे विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रातील सराव व कौशल्यविकासासाठी अधिक चांगल्या संधी उपलब्ध होणार असल्याने विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. शारीरिक शिक्षण संचालिका डॉ. प्रतिमा लोणारी यांनी आभार मानले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख